इयत्ता दहावी - विषय मराठी

बातमी लेखन

---

**बातमी लेखनासाठी आवश्यक गुण-**

(१) लेखन कौशल्य

(२) भाषेचे उत्तम ज्ञान

(३) व्याकरणाची जाण

(४) सोपी, सुटसुटीत वाक्यरचना

(५) समग्र वाचन.

**कोणत्याही घडलेल्या घटनेची बातमी तयार करताना खालील गोष्टींचे भान राखणे महत्त्वाचे असते.**

(१) घटनेची विश्वासार्हता.

(२) तटस्थ भूमिकेतून लेखन.

(३) घटनेचा अचूक व योग्य तपशील.

(४) प्रत्यक्ष घडलेल्या घटनेचे लेखन होणे महत्त्वाचे.

(५) स्वत: च्या मनाची कोणतीही बाब त्यात समाविष्ट करू नये

**बातमी तयार करण्याचे निकष**

(१) शीर्षक- बातमीचा मथळा हा संपूर्ण बातमीचा/घटनेचा आरसा असतो.

(२) दिनांक, स्थळ, कालावधी संबंधित व्यक्ती यांचा अचूक उल्लेख असावा.

(३) घटना घडण्याच्या स्थितीप्रमाणे बातमीलेखनात काळाचा वापर केला जातो.

(४) जनक्षोभ वाढेल, कुणाच्याही भावना दुखावल्या जातील अशी वाक्ये/शब्द बातमीत नसावेत असे संकेत आहेत.

(५) बातमी लिहिताना प्रथम महत्त्वाचा मुद्दा नमूद करून त्यानंतर त्याचा तपशील द्यावा.

**बातमी तयार करणे-मूल्यमापन कृती :**

(१) दिलेल्या घटनेवर बातमी तयार करणे.

(२) दिलेल्या सूचक शब्दांवरून बातमी तयार करणे.

(३) कार्यक्रमाची बातमी तयार करणे.

## खालील विषयावर बातमी तयार करा.

**'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' या उपक्रमास शहरातील सर्वच शाळांकडून उत्तम प्रतिसाद.**

आमच्या वार्ताहाराकडून लोकजागृती दिनांक : १६ जानेवारी

### मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उपक्रमास उदंड प्रतिसाद

१ जानेवारी ते १५ जानेवारी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' या निमित्ताने शाळाशाळांमधून मराठी भाषा संवर्धन कार्यक्रम आयोजित केले जावेत, या उपक्रमास शहरातील सर्वच शाळांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला.

आमच्या प्रतिनिधींनी काही शाळांमध्ये स्वत: जाऊन या उपक्रमाची माहिती घेतली. विद्यार्थ्यांसाठी बहुतांश शाळांमधून वाचन तासांचे आयोजन केले होते. याबरोबरच भाषेचे महत्त्व विशद करणारी व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. त्या निमित्ताने सर्वच शाळांमध्ये ग्रंथ दिंडी, निबंध स्पर्धा, वाचन स्पर्धा, पुस्तक प्रदर्शन, कथाकथन स्पर्धा, व्याख्याने अशा अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील १०० शाळांमधून हा उपक्रम यशस्वीपणे राबवला गेला.

दरवर्षी 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' हा विद्यार्थी हिताचाउपक्रम शाळांमधून राबवला जाईल, अशी ग्वाही शाळांच्या मुख्याध्यापकांनी दिली.